दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड । गुरूवार
२६.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २५९
किंमत : ३ रू. पाने : ४

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24





# १६ दिवस उलटूनही मुख्य आरोपी मोकाट

## पोलिसांच्या तपासावर खासदार बजरंग सोनवणेंचा संताप

बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा खून होऊन १६ दिवस उलटले तरी मुख्य आरोपी फरार आहेत. पोलीस आणि सीआयडीच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पोलीसच आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप विरोधक करत असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पोलिसांच्या तपासावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी पत्रकार परिषदेत आरोपांच्या फैरी झाडल्या. इतकी निर्घृण हत्या करणारे आरोपी मोकाट कसे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांनी प्रकरणात मोठी मागणी केली आहे. (पान २ वर )

### ...तर १ जानेवारी रोजी उपोषण

१ तारखेपासून तपास नाही लागला तर मी उपोषणाला बसेन. जोपर्यंत प्रकरणाचा छडा लागणार नाही, तोपर्यंत उठणार नाही, अशी भूमिका सोनवणे यांनी जाहीर केली. त्यामुळे पोलीस यंत्रणेने या प्रकरणाच्या खोलात जावं. देवेंद्र फडणवीस हे कर्तव्यदक्ष आहेत. ते न्याय देतील अशी आशा आहे, असे ते म्हणाले.



### पोलिसांवर कुणाचा दबाव?

खासदार सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत पोलिसांवर आरोपाच्या फेरी झाडल्या. घटनाक्रम सांगताना, ६ डिसेंबर रोजी काय झाले याची माहिती दिली. खंडणीसाठी आलेल्या आरोपींनी सरपंचाला मारहाण झाली. त्यानंतर काही लोकांनी मध्यस्थी केली. त्यानंतर आरोपी निघून गेले. त्यानंतर गार्ड आणि सरपंच देशमुखाने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पण त्यांची फिर्याद घेतली नाही. तीन तास बसून ठेवलं. जातीवाचक शिवीगाळची फिर्याद घेतली नाही. थातूरमातूर फिर्याद घेतली. त्यानंतर ९ तारखेला आरोपींना अटक दाखवून जामीन दिली. बीड जिल्ह्यात अशी ▶▶पान २ वर

### मोर्चामध्ये शरद पवारांसह अनेक नेते होणार सहभागी

या सर्व घटनेत पोलीसांच्या निष्क्रियतेवर आणि आरोपींना पाठीशी घालण्याच्या प्रकाराविरोधात विरोधक आक्रमक झाले आहेत. शनिवारी बीडमध्ये मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यात शरद पवार, जितेंद्र आव्हाड यांच्यासह अनेक नेते सहभागी होणार आहे. बीडचे खासदार ▶▶पान २ वर

### खासदार बजरंग सोनवणे यांच्या पाच मागण्या

१) २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी कुणाला बोलावलं होतं, कुणी बोलावलं होतं ते तपासून काढा. खंडणीच्या गुन्ह्याच्या फिर्यादीत ते आलं आहे, त्याचा सखोल अभ्यास करा. २) ६ डिसेंबर रोजी जी केस झाली, त्याचा सीडीआर काढा. त्यात अॅट्रोसिटी का घेतली नाही ते काढा. ३) ९ तारखेला गुन्हा दाखल केला. किडनॅपिंगचा गुन्हा तीन तास लेट का केला त्याचा तपास करा. पोलिसांना कुणा कुणाचे फोन आले होते त्याचा सीडीआर काढा. ४) पकडण्यात आलेल्या आरोपीच्या मोबाईलचा सीडीआर काढा. तुम्ही सीडीआर काढू शकता ना. त्यांचे मोबाईल टाका ट्रॅकला. सत्तेच्या जोरावर इलेक्शनमध्ये आमचे मोबाईल ट्रॅकवर टाकले होते. आरोपीचे सीडीआर का काढत नाही, असा सवाल त्यांनी केला. ५) मास्टरमाईंड कोण आहे, त्याचा शोध घ्या. याच आमच्या मागण्या आहेत. इथल्या पीएसआय, पीआयचे सीडीआर काढा. बीड जिल्ह्यात अनेक पीआय आहेत त्यांच्या बदल्या करा. ते सालगड्या सारखे वागले, त्यांना बदला. मटक्याचे धंदे बंद करा. बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था प्रस्थापित करा. बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिली नाही, असा आरोप त्यांनी केला.


# बीड जिल्ह्यात १० महिन्यात

**३६ खून**

**१५६ अत्याचार**

**३८६ विनयभंग**

बीड, (प्रतिनिधी) :- बीड जिल्हा आहे की गँग ऑफ वासेपूर सिनेमातील वासेपूर असा प्रश्न विचारायची वेळ आली आहे. कारण जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या गेल्या १० महिन्यांच्या कालावधीत बीड जिल्ह्यात ३६ खून झाल्याची नोंद पोलीस ठाण्यात झाली आहे. यामध्ये मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मर्डरचाही समावेश आहे. सरपंच देशमुख यांच्याशिवाय मरळवाडीचे सरपंच बापू आंधळे यांचा देखील खून करण्यात आला होता. जिल्ह्यात जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ३६ खून झाल्याची नोंद आहे. यात परळीतील सरपंचाच्या खुनाचाही समावेश आहे. यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्याचाही समावेश होता. याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. याला अनेक महिन्यांचा कालावधी उलटला तरी हा नेता अद्यापही एलसीबी आणि स्थानिक पोलिसांना सापडलेला नाही. तसेच खून करण्याचा प्रयत्न केल्याच्याही १६८ घटनाही घडलेल्या आहेत. गर्दी करून मारामारी करणे, दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे १० महिन्यांत दाखल आहेत. यातील ७ गुन्हे अजूनही उघड झालेले नाहीत. याशिवाय १५६ अत्याचाराच्या ३८६ विनयभंग झाल्याच्या घटना देखील या कालावधीत समोर आल्या आहेत. बीड जिल्ह्यात महिला, मुली देखील सुरक्षित नाहीत. १० महिन्यांत अत्याचाराच्या १५६ तर विनयभंग, छेडछाडीच्या ३८६ घटना घडल्या आहेत.



# वाल्मिक कराड सरकारपेक्षा मोठा आहे का?

## २ दिवसात अटक करा, मराठा क्रांती मोर्चाचं सरकारला अल्टिमेटम

बीड, (प्रतिनिधी) :- कोण आहे वाल्मीक कराड सरकार आणि संविधानापेक्षा मोठा आहे का? त्याला दोन दिवसात अटक करा, नाहीतर आम्हाला पुन्हा आंदोलन करावं लागेल, असा अल्टिमेटम मराठा क्रांती ठोक मोर्चाने महायुती सरकारला दिला आहे. खरं तर संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून आता सरकारवर दिवसेंदिवस दबाव वाढतोय. त्यामुळे आता सरकार बीड प्रकरणावरून काय अॅक्शन घेते? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून सध्या संपूर्ण महाराष्ट्र पेटलाय. या प्रकरणात देशमुख कुटुंबियांच्या अनेक नेते आणि आंदोलनकर्ते



भेटून त्यांचं सात्वन करत आहेत.यासोबत या प्रकरणातील मास्टरमाईंडच्या अटकेसाठी सरकारवर दबाव टाकतायत. अशात आता मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक आबासाहेब पाटील यांनी मयत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सात्वन पर भेट घेतली आहे. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना आबासाहेब पाटील म्हणाले की, कोण आहे वाल्मिक कराड सरकार पेक्षा मोठा आहे का? संविधानाने कायद्यापेक्षा मोठा आहे का? त्याला दोन दिवसात आत नाही टाकला तर पुन्हा आंदोलन करणार, त्यामुळे आम्हाला आंदोलन करायला भाग पाडू नका, असे आबासाहेब पाटील यांनी सरकारला ठणकावुन सांगितलं आहे.

# बीड नव्हे, मुख्यमंत्री फडणवीस यांना हवंय 'या' जिल्ह्याचं पालकमंत्रीपद

नागपूर, (वृत्तसेवा):-विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर बऱ्याच दिवसांनी महायुतीतील मंत्रीमंडळाचा शपथविधी पार पडला. त्यानंतरही खातेवाटप होण्यासाही काही दिवस लागले. अखेर आता खातेवाटप पार पडलं असलं तरी पालकमंत्री पदावरून सत्ताधारी नेत्यांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पालकमंत्री पदावरून एक महत्वाचं विधान केलं आहे. आपल्याला कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री पद हवं हे फडणवीसांनी स्पष्टच सांगितलं. नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधताना ते या विषयावर स्पष्टच बोलले. 'पालक मंत्र्याबाबत चंद्रशेखर बावनकुळे आणि दोन उपमुख्यमंत्री ठरवतील. मला बीडला पाठवलं तर मी जाईल. खरंतर मुख्यमंत्री कोणत्याही जिल्ह्याचं ▶▶पान २ वर



# बीडमध्ये राष्ट्रपती शासन लावावं अशी स्थिती




मुंबई, (वृत्तसेवा):-बीड आणि परभणीच्या घटनांवरुनही खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर जोरदार ताशेरे ओढले. ''बीडची परिस्थिती अशी आहे की एका जिल्ह्यात राष्ट्रपती शासन लागू करावं. आपल्या घटनेत तशी तरतूद नाही. मी परिस्थिती सांगतो. तिथे सामाजिक राजकीय परिस्थिती गंभीर आहे. तिथे दंगल होईल, लोक रस्त्यावर येतील अशी परिस्थिती आहे'' असं संजय राऊत म्हणाले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन संपूर्ण बीड जिल्ह्यात संतापाची भावना आहे. लोकांच्या मनात आक्रोश आहे. संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणतेने हत्या करण्यात आली. यात वाल्मिक कराडच मुख्य नाव येत ▶▶पान २ वर

### बीडचा आरोपी तुमच्या मंत्रिमंडळात

''बीड आणि परभणीत ज्या घटना घडल्या. त्यावर फडणवीस थातूर मातूर उत्तर देत आहेत. थातूरमातूर हा शब्द योग्य आहे. सरकारचे मंत्री बीडला जात आहे. काय काम आहे तिथे? बीडचा आरोपी तुमच्या मंत्रिमंडळात. तुमच्या खात्यात. परभणीचा आरोपी अजूनही पोलीस खात्यात. ज्याने कस्टडीत सोमनाथ सूर्यवंशीला मारलं. ते पोलीस खात्यात तुम्हाला सलाम करत आहेत. आणि मंत्री जाऊन बीडमध्ये नौटंकी करत आहात हे तुम्हाला शोभतं का?'' असा प्रश्न संजय राऊत यांनी विचारला.

# म्हणा 'मम'

## देवाभाऊची 'सत्ता' नारायण कथा ''लावा डोळ्याला पानी''

**क्रॉसलाईन**

देवेंद्र फडणवीस हे राज्याचे सीएम आहेत ते सरकारचे प्रमुख तर आहेच, मात्र ते सरकारमध्ये सहभागी असलेल्या तीन ही पक्षाचे देखील मॉनिटर असावेत, कारण त्यांनी ज्या पद्धतीने सत्ता कथेचे वाचन सुरू केले आहे. त्यावरून ते सुलभपणे लक्षात यावे की, स्वत:च्या पक्षातील शत्रू आणि शत्रू पक्षातील मित्र आणि मित्र पक्षातील सूत्र देवेंद्र यांनी अगदी सेट केले आहे. बीड येथील हत्या प्रकरण देवेंद्र यांनी ज्या पद्धतीने हाताळले आहे त्यात देखील किती राजकीय कंगोरे आहेत ते संताप जनक ठरतात . संतोष देशमुख हत्या प्रकरणी त्यांच्या पोलिसांना आरोपी सापडत नाहीत कधी काळी स्कॉटलँड पोलिस पेक्षा नाव असलेली महाराष्ट्र पोलिस खून प्रकरणात कासव गतीने चालत आहे, एकीकडे आखे अधिवेशन संतोष देशमुख वर देणारे सरकार त्याच संतोष ला न्याय देण्यात कसर सोडते आहे का ? एकीकडे त्यांच्या पक्षातील एक आमदाराचे धसकट पायात रुतवले, संतोष देशमुख प्रकरणात भांडणारा समोरचा नेता देखील सहाव्या मजल्याचा पाइक, काय कथा आहे, म्हणजे सरकार ते सरकार आणि सरकारच्या समोरचा माणूस देखील सरकारचाच, सुरेश धस हत्या प्रकरण अगदी भावनिक होऊन तडपेणे मांडत आहेत लढत आहेत मात्र आपल्या जवळचा मुख्यमंत्री असताना स्वतच्या पक्षाचा सी एम असताना धस यांना रस्त्यावर येण्याची भाषा करावी लागते म्हणजे सरकार त्यांच ऐकत नाही का मग सरकारला हे अपेक्षित आहे. संतोष देशमुख प्रकरण अत्यंत निर्दयी संताप जनक आहे मात्र यात आता राजकीय कंगोरे नाहीत हे म्हणणे परखड लेखणीचे लक्षण ठरणार नाही, कुणी काहीही म्हणतील मात्र आता या घटनेत मुंबई बारामती नागपूर पासून आष्टी माजलगाव बीड पर्यन्त राजकीय कयास डोकेबद्ध आहेतच. देवेंद्र यांनी सराटी येथील मराठा समाजाची गर्दी पाहून आणि दाखवून ओबीसी सोबत डीएनए जुळवून घेतला, या हत्ये प्रकरणी देखील मराठा समाज एकवटला आहे हे काय फडणवीस यांना माहित नाही का? जरांगे यांच्या निमित्ताने आरक्षणाचा लढा उभा राहिला त्यात मराठा भीती निर्माण करण्यात कुणाला तरी यश आले आणि यातून ओबीसी धवल क्रांति साधत देवेंद्र आणि टीम सवा दोनशे पार झाली, देवेंद्र यांनी मिळालेली सत्ता स्व केंद्री केली, काही मंत्री वरुण खाली आले खरे मात्र त्यांना खाते देण्यात ▶▶पान २ वर



# बीडमध्ये हातभट्टी दारू अड्ड्यावर धाड



बीड, (प्रतिनिधी): - पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशावरून पो.नि. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथकाने आज पहाटे पात्रुड गल्ली भागातील गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर धाडी टाकल्या. या कारवाईत डीबी पथकातील कर्मचाऱ्यांनी शेकडो लिटर रसायन उध्वस्त केले. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. बीड शहर ठाण्यातील डीबी पथकातील सपोनि राठोड, सहाय्यक फौजदार सिरसाट, पोहे तांबारे, पोशि सय्यद, मनोज परजणे हे आज सकाळी अवैध धंद्यांवरील कारवाईसाठी जात असतांना पात्रुड गल्ली भागातील पत्र्याच्या शेडमध्ये हातभट्टी दारूचा अड्डा असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पोनि बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८ बाजण्याच्या सुमारास पात्रुड गल्ली भागात दोन ठिकाणी छापे टाकून सहा निळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या डूम मधील शंभर लिटरचे रसायन व दोन पत्र्याच्या डब्यामधील १८ लिटरचे रसायन ▶▶पान २ वर



# अब तक ५६!



सरकारी यंत्रणा प्रसंगी किती अक्कलशून्य होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे वस्तू-सेवा परिषदेची (जीएसटी कौन्सिल) ताजी बैठक. अलीकडे माजी केंद्रीय अर्थसल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी ही परिषद कराचे दर कमी/ जास्त करण्यापलीकडे काही करू शकत नाही अशी टीका केली होती. त्यांच्या या टीका-स्वयंवरात सरकारधार्जिणे मोहनदास पै आणि विद्यमान सरकारचेच माजी वित्तसल्लागार के. सुब्रमण्यम हे देखील सहभागी होऊन सरकारवर चार टीकाक्षता टाकते झाले. यातील पै हे 'इन्फोसिस' या प्रख्यात कंपनीच्या संस्थापकांपैकी एक. विद्यमान सरकारची ते इमाने इतबारे तळी उचलत आले आहेत. तरीही त्यांना वस्तू-सेवा परिषदेचे काही निर्णय 'मूर्खपणाचे' वाटतात आणि नुसते वाटतातच असे नाही; तर ते तसे बोलूनही दाखवतात. के. सुब्रमण्यम हे तर याच सरकारने नेमलेले अर्थसल्लागार. ते वस्तू-सेवा कर परिषदेच्या निर्णयामागील तार्किकतेबाबत प्रश्न उपस्थित करतात. याचा अर्थ इतके दिवस या परिषदेच्या विनोदी कारभारावर सोयिस्कर मौन बाळगणाऱ्यांचाही संयम संपत आला असून त्यांनाही आता सरकारला खडे बोल सुनावण्याखेरीज पर्याय नाही, असे वाटू लागले आहे. हा बदल स्वागतार्हच. याचे कारण 'लोकसत्ता' सातत्याने या करातील विसंगती दाखवत आला असून उशिराने का होईना सरकारधार्जिण्या तज्ज्ञांनाही या करातील विकृती दाखवून देण्याची गरज जाणवू लागली आहे. यावरून या करातील विसंगतीत सुलभतेचा कसा बळी गेला आहे हे लक्षात येईल. कर जन्मास आल्यापासून गेली सात वर्षे हेच सुरू आहे. तथापि ताज्या बैठकीत शहाणपणाचा कडेलोट झाला असे म्हणावे लागते. त्यामुळे त्याचा समाचार घेणे आवश्यक. वैद्यकीय विमा हप्त्यांवरील वस्तू-सेवा कर कमी करण्याचा अत्यंत अपेक्षित निर्णय या बैठकीत झाला नाही, हेच यामागील कारण नाही. तर पॉपकॉर्न, म्हणजे मक्याच्या लाह्या, या भुस्कट खाद्यावरील कराचा मुद्दा. वास्तविक वस्तू-सेवा कर परिषदेत राज्याराज्यांचे अर्थमंत्री सहभागी असतात आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची तीत प्रमुख उपस्थिती असते. इतक्या मान्यवरांनी एकत्र येऊन निर्णय घेऊन घेऊन घेतला तो कसला? तर पॉपकॉर्नला कराच्या जाळ्यात आणण्याचा. त्यात काही गैर नाही. पण विनोद आहे तो या पॉपकॉर्नच्या वर्गीकरणाचा. म्हणजे या मका लाह्या सुट्या विकल्या गेल्या तर त्यावर पाच टक्के वस्तू-सेवा कर आकारला जाईल. या लाह्या खारवलेल्या असल्या आणि कंपन्यांकडून नाममुद्रा वेष्टनासह विकल्या गेल्या तर त्यावर १२ टक्के कर आकारला जाईल. आणि या लाह्या साखरेच्या पाकात घोळवलेल्या (कॅरामलाईज्ड) असल्या तर त्यावरचा कर असेल १८ टक्के. म्हणजे खारवलेल्या लाह्यांवर १२ टक्के आणि गोडावलेल्या लाह्यांवर १८ टक्के असे हे वर्गीकरण. या उच्चकोटीच्या अक्कलशून्यतेचे वर्णन करता येणे अशक्य. बरे यातून प्रचंड प्रमाणात काही महसूल हाती लागेल असे म्हणावे तर तसेही नाही. या वर्षी देशभर विकल्या गेलेल्या मक्यांच्या लाह्यांचे मूल्य होते १७०० कोटी रुपये. त्यावर समजा सरसकट १८ टक्के कर जरी आकारला तरी ही रक्कम होते ३०० कोटी रु. आपली वर्षभराची वस्तू-सेवा कराची जमा आहे २२ लाख कोटी रुपयांच्या घरात. इतक्या रकमेत ३०० कोटी रुपयांचा लाह्यांचा वाटा भरतो जेमतेम ०.०१३ टक्के इतका नगण्य. म्हणजे अवघ्या ०.०१३ टक्के महसुलासाठी एकाच पदार्थाची विभागणी तीन तीन घटकांत करण्यात कोणते शहाणपण असा प्रश्न खुद्द के. सुब्रमण्यम विचारतात. याचा अर्थ असे हास्यास्पद निर्णय घेण्याची वस्तू-सेवा परिषदेची परंपरा या बैठकीतही पाळली गेली इतकेच. याआधीच्या बैठकीत महिलांस मासिक पाळीत वापरावे लागणारे सॅनिटरी नॅपकिन्स आणि टॅम्पून्स यांच्यातही अशीच कर दर विभागणी करण्याचे सुपीक शहाणपण या बैठकीने दाखवले होते. इतकेच नव्हे तर तांदूळ थेट पोत्यातून सुटे विकले गेल्यास एक दर, ते प्लॅस्टिक पिशव्यांतून विकले गेल्यास दर वेगळा, गुजरात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर खाखरा या अशाच भुस्कटी पदार्थास कर सवलत इत्यादी अनेक विनोदी विक्रम या परिषद बैठकीच्या नावावर आहेत. हे सर्व जुन्या 'विक्री कर' रचनेची आठवण करून देणारे ठरते. त्या वेळी चामड्याचे तळ असणाऱ्या बुटांना एक दर, रबराचे तळ असणाऱ्यांस वेगळा, बुटांस नाडी असेल तर एक दर, नसेल तर वेगळा असे हास्यास्पद प्रकार आपल्याकडे होते. वस्तू-सेवा कर आल्याने ते संपुष्टात येऊन सर्वत्र एकच एक कर रचना असेल अशी अपेक्षा होती. ती सर्वार्थाने फोल ठरली. याचा अर्थ ही परिषद वस्तू-सेवा कराच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासत असून त्यात बदल करावा असे सरकारला अजूनही वाटत नाही. अत्यंत सुलभता हे या वस्तू-सेवा कराचे अंगभूत वैशिष्ट्य असायला हवे. त्याचीच आपल्याकडे बोंब. कमालीचा गुंतागुंतीचा, व्यावसायिकांच्या अडचणींत वाढ करणारा आणि सरकारी अधिकाऱ्यांना अर्थ लावण्याची मुभा देणारा या सर्व त्याज्य गुणांनी हा कर भरलेला असून त्याचे सुलभीकरण तब्बल सात वर्षांनंतरही सरकारला करता आलेले नाही. त्यामुळे त्याची अंमलबजावणी अत्यंत गोंधळाची आणि भ्रष्टाचारास वाव देणारी आहे. हे आतापर्यंत अनेकदा दिसून आलेले आहे. म्हणजे पारदर्शकता ही मूलभूत अर्हताच या कर रचनेत नाही. आणि ती नसेल तर संबंधित विभागांच्या सरकारी अधिकाऱ्यांस आपापल्या परीने आणि सोयीने अर्थ लावण्याची मुभा अधिकृतपणेच मिळते. तशी ती मिळणे हे भ्रष्टाचारास निमंत्रण देणारे असते. कारण ज्याक्षणी अधिकाऱ्यांहाती कर दराचा अर्थ लावण्याचा अधिकार जातो, तो क्षण ही भ्रष्टाचाराची सुरुवात असते. म्हणून कोणालाही कसलाही अर्थ लावावा लागणार नाही इतकी पारदर्शी व्यवस्था तयार करणे ही भ्रष्टाचार मुक्तीची सुरुवात असते. ती वस्तू-सेवा कराने होईल अशी अपेक्षा होती. आज सात वर्षांनंतरही ती पूर्ण होताना दिसत नाही. वस्तुत: वस्तू-सेवा हा अप्रत्यक्ष कर. तो एक प्रकारे अन्यायकारक असतो. म्हणजे २७ मजल्यांच्या खासगी इमारतीत राहणारा धनाढ्य आणि त्याच इमारतीच्या पदपथावरील गळक्या झोपडीत राहणे नशिबात आलेला गरीब या दोघांसही एकाच दराने कर आकारला जातो. उदाहरणार्थ धनाढ्याने आपल्यासाठी वा नोकरचाकरांच्या वरच्या खाण्यासाठी केलेली बिस्कीट खरेदी आणि रस्त्यावरच्या गरिबाने पोटाची आग विझवण्यासाठी केलेली बिस्कीट खरेदी या दोन्हींसाठी आकारला गेलेला कर एकच असतो! म्हणून कार्यक्षम आणि कर- पारदर्शी देशांत अप्रत्यक्ष करापेक्षा प्रत्यक्ष करावर अधिक भर दिला जातो. पण आपले सगळेच उफराटे! आणि वर ही गुंतागुंत!! वस्तू-सेवा कर परिषदेची नुकतीच झालेली बैठक ही ५५ वी होती. आरोग्य विमा, विमान इंधन, राज्यांना द्यावयाचा परतावा आदी विषयांवर या बैठकीत काही भरीव निर्णय होणे अपेक्षित होते. ते झाले नाहीत. बैठकीची चर्चा कशासाठी? तर पॉपकॉर्नवरील कर भिन्नतेच्या हास्यास्पद मुद्द्यासाठी. आता अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवर आगामी बैठकीचा वायदा देण्यात आलेला आहे. त्या बैठकीत तरी काही सकारात्मक निर्णय होतील ही आशा. नपेक्षा त्यानंतर 'अब तक ५६' बैठका झाल्या तरी घोळ काही निस्तरला जाण्याची लक्षणे नाहीत, असे म्हणावे लागेल.

# अंबाजोगाईत मनुस्मृती दहन करून केला विषमतावादी व्यवस्थेचा निषेध



अंबाजोगाई, (प्रतिनिधी)-अंबाजोगाईत बुधवारी मनुस्मृती दहन करून विषमतावादी व्यवस्था नाकारत शासन व प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर भारतीय संविधान प्रेमी नागरिकांकडून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाचा जयघोष करण्यात आला. यावेळी संविधान प्रेमी नागरिकांकडून बुधवार, दिनांक २५ डिसेंबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. तर सहभागी आंदोलकांनी मनुस्मृती दहन केले. यावेळी कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भीमराव सरवदे, आर.जी.मस्के, अशोक पालके, राजेश वाहुळे, धीमंत राष्ट्रपाल, विनोद शिंदे, हमीद चौधरी यांनी उपस्थित संविधान प्रेमी नागरिकांना संबोधित केले. उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड या ठिकाणी मनुस्मृतीचे दहन करून येथील विषमतावादी व्यवस्था नाकारली, स्त्रियांना गुलामगिरीतुन मुक्त केले. परंतु, आजही या देशामध्ये संविधान लागु असतांना सुध्दा येथे मनुचा विचार जपला जातो. राजस्थान मध्ये जाहिररित्या मनुचे मंदीर बांधले जाते, रोज स्त्रियांना गुलाम बनविणारे विचार जाहिररित्या पेरले जातात, सनातनी कॉर्पोरेट सत्ता भारतात आणि महाराष्ट्र राज्यात आल्यापासून दलीत, अदिवासी, अल्पसंख्याक यांना लक्ष करून पोलीसांमार्फत यांची दडपशाही केली जातेय. मनुची विषमतावादी व्यवस्था टिकविण्यासाठी शासन व प्रशासन काम करीत आहे. या विषमतावादी व्यवस्थेचा आम्ही जाहिर निषेध करून त्या मनुची मनुस्मृती नाकारत आहोत. असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदरील निवेदनावर निवेदक कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भिमराव सरवदे, आर.जी.मस्के, अशोक पालके, धीमंत राष्ट्रपाल, विनोद शिंदे, हमिद चौधरी, राजेश वाहुळे, अनिल ओव्हाळ, अशोक ढवारे, अविनाश कुऱ्हाडे, रवि आवाडे, मुक्ता वायदंडे, बादल तरकसे, प्रेम माने, वैजनाथ वाघमारे, मनिष आदमाने, संघपाल तरकसे, गुलनाज शेख, अमोल सरवदे, अजय गोरे, बाबा शेख, प्रदीप वारकरी, राकेश काळे, सुशिल गायकवाड, दिलीप गोरे, राम काटे, हनुमंत गायकवाड, विद्या गायकवाड, मंजुषा कसबे, आरोही कसबे, छाया कसबे, लक्ष्मी कसबे, सुनंदा जोगदंड, विद्या गावडे, उषा गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या प्रसंगी विशाल पोटभरे, अमर वाघमारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# के.एस.पी. विद्यालय येथील साने गुरुजी जयंती उत्साहात संपन्न



बीड, (प्रतिनिधी):- दि.२४/१२/२०२४ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील साने गुरुजी पांडुरंग सदाशिव साने यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम मान्यवराच्या हस्ते साने गुरुजीच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आला. यावेळी मुलांना साने गुरुचीच्या कार्या बदल अवगत करण्यात आले. साने गुरुजींनी कादंबरी, कथा, बालसाहित्य, कविता, निबंध, चरित्र अशा साहित्य प्रकार त्यांनी लिहीले. मनोरंजना बरोबरच मुलांवर उत्तम नैतिक संस्कार व्हावेत, हे त्यांचे उद्दिष्ट होते. श्यामची आई हे त्यांचे आत्मकथनपर पुस्तक विशेष गाजले. या पुस्तकावरून आचार्य अत्रे यांनी श्यामची आई हा चित्रपट काढला. त्याला उत्कृष्ट चित्रपट निर्मितीचा स्वतंत्र भारतातील पहिला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. या बदल मुलांना सांगण्यात आले. या कार्यक्रमास श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# साने गुरुजींची जयंती उत्साहात साजरी

बीड, (प्रतिनिधी):-बीड येथील संस्कार विद्यालयातील पहिली दुसरी विभागामध्ये परमपूज्य साने गुरुजी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली . कार्यक्रमाच्या सुरुवातीस माता सरस्वती व साने गुरुजींच्या प्रतिमा चे पूजन माननीय मुख्याध्यापिका श्रीमती जाधव ताई व विभाग प्रमुख श्रीमती पारगावकर ताई यांच्या हस्ते करण्यात आले. साने गुरुजींच्या जयंती निमित्त विभागामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात बालगोपालांनी साने गुरुजींचे जीवन नाट्य स्वरूपात मुलांसमोर सादर केले. त्याग, ममत्व, मातृ हृदयी, देशप्रेम इत्यादी गुणांचे दर्शन या नाट्यातून मुलांसमोर मुलांनी प्रकट केले. ''खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे'' याचे समग्र दर्शन बाल अभिनयातून पहावयास मिळाले . कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक प्रमुख श्रीमती डोईफोडेताई यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती अहिरताईनी केले. कार्यक्रमास विभागातील सर्व शिक्षक विद्यार्थी व पालक उपस्थिती होते.

पान १ वरून

### १६ दिवस उलटूनही...

* मे महिन्यापासून आरोपींचा त्रास : खासदार बजरंग सोनवणे यांनी हा खून एकाकी झाला नसल्याचे सूतोवाच केले. गेल्या सहा महिन्यांपासून आरोपी त्रास देत असल्याचा आरोप त्यांनी केला. ''संतोष देशमुख यांचा मर्डर झाला. या प्रकरणाची सुरुवात मे महिन्यात झाली. खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता. त्यातून अनेक गोष्टी झाल्या. गुन्ह्यानंतर शिक्षा झाली नाही. हा विषय तिथेच थांबला. त्यानंतर २८ नोव्हेंबरला खंडणी मागण्यासाठी कुणाला तरी बोलावलं अशी माहिती आली. २९ नोव्हेंबरला शिंदे आणि खोपटे नावाचे अधिकारी गेले. खंडणी मागितली. त्यावेळी कामं बंद करा, नाही तर आम्हाला येऊन भेटा, अशी माहिती आहे. एवाडा कंपनीने काम बंद केलं नाही. त्यानंतर ६ डिसेंबर हा दिवस वेगळा दिवस आहे. देशाच्या दृष्टीने. आरोपींनी मस्साजोगच्या ऑफिसजवळ अधिकाऱ्यावर हल्ला केला. सोनावणे नावाच्या वाचमनलाही मारलं गेलं. त्याला जातीवाचक शिवीगाळ केली. संतोष देशमुख यांना सेक्युरिटी गार्डने ही घटना सांगितलं. त्यांनी सरपंच देशमुखांकडे मदतीची मागणी केली'', अशी माहिती त्यांनी दिली. * या प्रश्नांची उत्तर द्या : यावेळी सोनवणे यांनी या खूनामागील संपूर्ण घटनाक्रम सांगीतला. त्यांनी देशमुख यांना टॉर्चर करून मारलं. ५६ वण पोस्टमार्टममध्ये आलं आहे. त्याचा असा काय गुन्हा होता? असा सवाल विचारला. फक्त पोलीस तक्रार झाली होती का? मी सांगितलेला हा गुन्ह्याचा क्रम आहे. आधीच तक्रार घेतली असती आणि आरोपींचा शोध घेतला असता तर हत्या घडली नसती, असे ते म्हणाले. ९ तारखेला घटना घडल्यावर सरपंचाच्या भावाला कोण बोलला. बनसोड नावाचा पोलीस अधिकारी होता. त्यांना कुणाचा फोन आला. त्यांचा सीडीआर काढा. पाटील आणि महाजन या अधिकाऱ्यांना कुणाचा फोन आला. त्यांचा सीडीआर काढा. तसं केलं तरच गुन्हेगार सापडतील, असे ते म्हणाले. पोलीस म्हणतात चौथा आरोपी पकडला. तर सत्ताधारी पक्षाच्या आमदार म्हणतात आरोपी सरेंडर झाले. यात तफावत काय. खरं काय. चौथा आरोपी खून आणि खंडणीच्याही गुन्ह्यात आहे, असा दावा त्यांनी केला. मारेकर्यांना फाशी द्या. मास्टर माईंडलाही शिक्षा झाली पाहिजे. एक दोन आरोपींना अटक करून फायदा काय. अजून तीन आरोपी फरार आहे. त्यांना कधी अटक करणार आहात? असा सवाल त्यांनी केला. आम्ही अंत्यविधी करणार नव्हतो. पोलीस म्हणाले दुपारपर्यंत वेळ द्या. आम्ही त्यांना वेळ दिला. आज १५ दिवस झाले. तीन आरोपी फरार आहेत. मग आम्ही अंत्यविधी करून चूक केली का? जे खंडणीत आहेत, तेच मर्डरमध्ये आहेत. त्यामुळे संपूर्ण केस क्लब करून कारवाई केली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

### पोलीसांवर कुणाचा...

घटना का घडली. साधी तक्रार घ्या. जातीवाचक शिवीगाळची तक्रार घेऊ नका असा कुणाचा फोन आला? कुणी सांगितलं. याचा शोध घ्या. यात पीएसआय इन्व्हॉल्व होते का? याचा शोध घ्या. आरोपींना जामीन झाल्यावर पीएसआय त्यांच्यासोबत हॉटेलमध्ये जातात हे सर्वांनी पाहिलं आहे, असे ते म्हणाले.

### मोर्चामध्ये शरद...

बजरंग बप्पा सोनवणे यांनी याविषयीची माहिती दिली. २८ डिसेंबर रोजीच्या मोर्चात कोण सहभागी होणार माहीत नाही. अंजली दमानिया सहभागी होणार की नाही माहीत नाही. पण मी मात्र या मोर्चात सहभागी होणार आहे. खासदार म्हणून माझी जबाबदारी आहे. मी सहभागी होणार आहे, असे ते म्हणाले.

### बीडमध्ये राष्टपती...

असून तो मंत्री धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तीय गोटातील असल्याचा दावा करण्यात येतोय. ''मुख्यमंत्र्यांनी बीडला गेलं पाहिजे. ते गृहमंत्री आहेत. त्यांच्या लाडक्या धनुभाऊला घेऊन जावं. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचा आक्रोश जर या सरकारला दिसत नसेल तर हे सरकार माणुसकी शुन्य आहे. त्याबद्दल आमच्या मनात कोणतीही शंका नाही'' असं संजय राऊत म्हणाले.

### बीडमध्ये हातभट्टी...

उध्वस्त केले तर दुसऱ्या कारबाईत पाच लिटरचे दोन ड्रम व इतर साहित्य उध्दवस्त करण्यात आले. या दोन्ही कारवाईत हजारो रूपयांचा मुद्देमाल जप्न करण्यात आला असुन या प्रकरणी पो.ह. आजिनाथ सानप यांच्या फिर्यादीवरून राकेश प्रभाकर उर्फ गुडबा जाधव याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

### बीड नव्हे...

पालकत्व घेत नसतात. पण गडचिरोलीचं पालकमंत्रीपद घ्यावं अशी माझी इच्छा आहे. अर्थात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी परवानगी दिली तरच घेईन', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. यामध्ये धनंजय मुंडे यांचा खास माणूस असलेल्या वाल्मिकी कराडचे नाव प्रमुख आरोपी म्हणून घेतले जात आहे. या घटनेला अनेक दिवस उलटून गेले तरीही अद्याप तीन आरोपींना अटक झाली नसून त्यामुळे राज्यातील वातावरण चांगलंच तापलं आहे. विरोधकांनी सरकारला चहूबाजूने घेरत धारेवर धरलं आहे. गेल्यावेळी धनंजय मुंडे हे बीडचे पालकमंत्री होते. यावेळीही त्यांनाच पालकमंत्रिपद मिळणार का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. मात्र बीडमधील सरपंचांच्या हत्येच्या घटनेमुळे राज्यभरात आक्रोश असून धनंजय मुंडे यांना पुन्हा बीडचं पालकमंत्रीपद देऊ नये , ते (पालकमंत्रीपद) मुख्यमंत्री फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घ्यावं अशी मागणी होत आहे. याच पार्श्वभूमीवर आता बीडचे नवे पालकमंत्री कोण याची जोरदार चर्चा सुरू आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारलं असता, बीडचं पालकमंत्री पद कोणाला द्यायचं यासंदर्भात मी अजितदादा आणि एकनाथ शिंदे मिळून ठरवू असं फडणवीस यांनी कालच म्हटलं होतं. तर आज त्यांना पुन्हा याबद्दल सवाल विचारण्यात आला असता फडणवीसांनी यावर पुन्हा भूमिका स्पष्ट केली. पालकमंत्री पदाचा निर्णय चंद्रशेखर बावनकुळे घेतील. मला बीडला पाठवलं तर मी जाईन. खरंतर मुख्यमंत्री कोणत्याही जिल्ह्याचं पालकत्व घेत नसतात. पण गडचिरोलीचं पालकमंत्रीपद घ्यावं अशी इच्छा असल्याचं मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखवलं. आता याबाबत अंतिम निर्णय काय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

### म्हणा 'मम'...

आणखी खाली घालण्यात देवेंद्र यांनी राजकारण साधले, माणसे सांभाळता येतील अश्या नेत्यांना पशू संवर्धन दिले, ओबीसीचे अर्धायू राजकीय असूरक्षेत जेव्हा त्यांच्या पक्षाने बाजूला केले त्या भुजबळ यांना जवळ घेण्यात फडणवीस चुकले नाहीत, धनंजय मुंडे त्याच वाटेवर नसतील कशावरून, अजित पवार यांना मातब्बर रांगेत ठेवायचे नसतील तर भुजबळ नंतर नंबर मुंडे यांचाच नसेल कशावरून? कारण धनंजय मुंडे यांनी संतोष देशमुख प्रकरणी प्रचंड आरोप अंगावर येत असताना गप्प बसीची गोळी कुणाच्या आदेशाने घेतली, धनंजय यांना अन्न भेटुच नये अशी स्थिति निर्माण करून त्यांचा भुजबळ केला जाण्याची शक्यता असताना त्यांना अन्न देण्यात देवेंद्र यांनी उदारता दाखवली म्हणे? बर एकीकडे अन्न द्यायचे आणि त्याच वेळी ना . मेघना आणि अंजली बीडच्या दिशेने कूच करायला लावायच्या, अजब आहे का नाही देव इन्द्र यांची कथा. दमानिया बाई काय न्याय हवा त्या प्रत्येक प्रकरणात जात नाहीत त्यांना प्रकरण क्रीम हवे असते असेच त्यांच्या आजवरच्या लढ्यातिल मुद्दे पाहता लक्षात येते, अनेक जन म्हणतात की अंजली दमानीया म्हणजे किरीट सोमयया यांचे फिमेल व्हरजन आहे? एकनाथ खडसे प्रकरण जे नागपूर साठी अडचणीचे ते त्यांनी हाताळले मात्र पूजा चव्हाण सारखे ना राठोड कडे त्या कधी फिरकल्या नाहीत, बीड येथील संतोष हत्या प्रकरणात त्यांचा इंटरेस्ट संतोष यांना न्याय नाही तर यात देखील एखाद्या मंत्र्याची विकेट निघते का यासाठी त्यांचे पाचारण प्रस्तावित आहे काय ? अजून एक माजलगाव चे आमदार प्रकाश सोळके ज्यांनी मनोज जरांगे यांच्या बद्दल अपशब्द वापरले म्हणून त्यांचा बंगला स्वाहा झाला ते संतोष साठी १० लाखाची मदत घेऊन मैदानात उतरले , समाज म्हणून त्यांची ही बांधिलकी असेल तर मग स्थानिक राजकारणात त्यांच्या वतीने ज्या मराठा बांधवांची पाठ लाल झाली त्याचे काय असा सवाल करणारे मथळे लावण्यात आले , अजित पवार यांचे दोन सहकारी एका निमित्ताने कसे परस्पर विरोधक आहेत , याचा अर्थ अजित पवार या प्रकरणी देखील आरोपी सोधण्या पेक्षा जे काही चालत आहे त्यात डोक लावत नसतील कशावरून ? आज मसाजोग म्हणजे पिंपली लाईव्ह झाले आहे, नुसते मंत्री राजकारणी येऊन जातेत फोटो काढतेत, आरोपी कसे सापडत नाहीत? मात्र नेत्यांना आरोपी पेक्षा संतोष देशमुख प्रकरण मराठा समाज म्हणून पहायचे आहे , खर हेच आहे आणि नाकारून ते बदलणार नाही, नेत्यांनी या हत्या प्रकरणात आपापल्या दुकाना चमकून घेण्यासाठी आटापिटा केलाच आहे. संतोष हत्या प्रकरण आपली राजकीय दुश्मनी काढण्याचे हत्यार वाटावे हे अत्यंत केविलवाणे आहे, जातीला कुणी अंगावर घ्याव म्हणून वास्तव माहीत असून कुणी बोलत नाही . मात्र संतोष हत्या प्रकरण दुर्दैवाने दोन जातीच्या तेढाचा मध्य बिंदु ठरतो आहे , आता प्रश्न पडतो सरकारला हेच तर हवे नसावे , आरोपी पकडले तर प्रकरण शांत होईल ? सरकार समोर येऊन तपासाची स्थिति सांगू शकते, सामाजिक सलोखा वाढवणाऱ्या बैठका घेऊ शकत मात्र ते का घेत नाही . पोलिस अधीक्षक आल्यावर सत्कार कसले घेतात? आल्या पासून त्यांनी स्टेटस मांडावे असे लोकांना वाटते . आता २८ ला होणारा मोर्चा सरकारला अपेक्षित आहे का , फडणवीस यांना हा मोर्चा हवा नसेल कशावरून ? शरद पवार आले परत मोर्चात येणार असतील त्यात मनोज जरांगे असतील तेव्हा ती हत्या जात समोर आणेल आणि फडणवीस यांना हेच अपेक्षित नसेल कशावरून ? कारण कोपरडी प्रकरणी ५८ मोर्चे निघाले अगदी पाच पाच लाखाचे अजून आरोपी जीवंत आहेत , किंबहुना त्या ५८ मोर्चातली कुठली एक मागणी देवेंद्र यांनी मंजूर केलीय , एक ही नसेल तर मग मोर्चे काढणाऱ्या समाजाची चेष्टाच ठरते की नाही , ज्या नेत्याने स्वतच्या ढेरीत ५८ मोर्चे पचवले त्यांच्या सरकारला मोर्चाने काय परिणाम होईल , मुळात संतोष देशमुख प्रकरणी मोर्चाची गरज का पडावी , सरकारला आरोपी मिळत नाहीत का ? मोर्चे काढून काहींच्या दुकाना सजतील काहींच्या वाढतील कुणी जातीचा नेता होईल , मात्र संतोष चे काय ? त्या संतोष च्या मुलीच्या डोळ्यात असलेल्या अश्रुंचे काय , मला आज ही आठवते कोपरडी च्या ताई साठी मोर्चा निघाला तेव्हा त्या ताईच्या आईला समोर आणले लोक भावनिक झाले , नंतर त्याच आईच्या दुसऱ्या मुलीच्या लग्नाला कुठला दुकानदार नव्हता म्हणे , वेळ निघून गेल्यावर कावे लक्षात येतात मात्र नंतर काय उपयोग ? चोरी झाल्यावर गार्ड ठेऊन काय उपयोग . मराठा समाज आधीच पिचला आहे प्रचंड वेदनेचे आयुष्य जगत असताना त्याच्या परिवारात एक करता लोकप्रिय सरपंच मारला जातो आणि त्यात राजकीय कनेक्शन असल्याचे लक्षात आल्याने तो चिडतो , याच वेळी त्याला न्याय हवा आहे हे सरकार समजून का घेत नसावे . उद्या गर्दी पाहून ''इतरांना'' देवेंद्र यांच्या भाषेत ते पहा मराठे दाखवायचे आहेत का ? ओबीसी मराठा या अध्यायातले मराठा वंजारा हे सुंदरकांड चालू आहे का हे सरकारने सांगितले पाहिजे , सरकारचे मंत्री मसाजोग ला हेलीकॉफ्टर ने आले म्हणजे कर्तव्य पार पडते का ? शरद पवार आले अजित पवार आले अनेक मंत्री आले विरोधी पक्षाचे आमदार आले , अहो या सांत्वनेत न्याय मिळत नाही . आरोपी कुठे आहेत ते सांगावेत , मात्र या हत्येच्या प्रकरणात तपास कमी आणि राजकारण अधिक होताना दिसत आहे ? सर्वांचा आपला आपला निशाणा नाही का ? धनंजय मुंडे यांनी सभागृहात न जाणे एवढे आरोप होऊन गप्प बसने कुणाच्या सांगण्यावरून ते फडणवीस यांनी राज्याला सांगितले पाहिजे, कारण यात अनेकांना धनंजय मुंडे सोबतचे आपले हेवेदावे काढायचे असतील , खुशाल काढावेत मात्र त्यासाठी देशमुखांचा संतोष का हाताळावा ? त्यांनी सदरील खून प्रकरणात राजकारण करावे वा करता यावे ही संधी सरकारने निर्माण केली आहे का ? देवेंद्र म्हणजे अगदी हुशार गृहमंत्री असताना आरोपी कुठल्या खेळासाठी रोखून धरलेत हा प्रश्न पडतो . वरुण बीडचा बिहार झाल्याची आवाई ठेवलेले पत्रकार लगातर उठवत आहेत ? बीडचा बिहारच ठेवायचा आहे का बारामती हे एकदा सांगावे , धनंजय मुंडे यांचे पक्ष प्रमुख अजित पवार यांनी . देवेंद्र यांनी आपल्या ठेवणीतल्या चेहऱ्यांना दारात 'चपलांचा खच जमवणारी खाती' दिली , आणि अजित पवारांना आरा रा नुसते कोरडे धरण ? एकूण सरकार लक्षात घेता देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात जे काही चालवले आहे ते अत्यंत अघोरी आत्मकेंद्री आणि असुरी सत्तेचा परिपाक ठरत नाही का ? समाजाच्या समोर समाज आणणे , नेत्यांच्या विरोधात नेते आणणे , निधीच्या लालचेत दावणीला बांधणे ? चुकीच्या पद्धतीने मिळणाऱ्या सत्तेला मी चिमट्याने देखील शिवणार नाही असे म्हणणाऱ्या वाजपेयी यांचा हा भाजपेयी , अटलजीचे परस्पर विरोधी टोक आहे ? पुरोगामी राज्य जातींच्या परस्पर भिडण्यात स्वाहा होणार असेल आणि त्याच आमच्या मुख्य मंत्र्यांना सोयरे सूतक नसेल तर ही आमच्या अस्मितेची नी'घरून' हत्या ठरते ?

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### बीड जिल्हयाचे भूमिपुत्र रुद्र पाखरे यांची बिहार पटणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेकरिता निवड



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे द्वारा राज्यस्तरीय सायकलिंग रोडरेस क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन गोंदिया जिल्हातील देवरी येथे दिनांक २३ ते २५ डिसेंबर दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेत बीड जिल्हातील गोमळवाडा तालुका शिरूर कासार येथील मुळ रहिवासी रुद्र आशा कल्याण पाखरे यानी युनिव्हर्सल इंग्लिश मेडियम हायस्कूल उमरखेड जिल्हा यवतमाळ विभाग अमरावती मार्फत सहभाग घेऊन अंजिक्य पद प्राप्त केले. म्हणून त्याची बिहार राज्यातील पटणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेकरिता महाराष्ट्र च्या राज्य संघात निवड झाली असून राष्ट्रीय खेळाडू होण्याचा मान प्राप्त झाला आहे. म्हणून त्याचे आजोबा गंगाधर पाखरे, भगवान तांदळे, काका श्रीकांत पाखरे ,मामा संभाजी खाडे, यशवंत तांदळे, वसंत तांदळे, विनोद आघाव ,संदिप आघाव इतर नातेवाईकांने कौतुक करुन पुढील स्पर्धेसाठी साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### भीमथडी जत्रेत चोरी करणारे गजाआड; ७१ हजार रुपयांची रोकड आणि पेनड्राइव्ह चोरला




पुणे । प्रतिनिधी

भीमथडी जत्रेमध्ये स्टॉलधारक महिलेच्या पिशवीतून चोरट्यांनी तब्बल ७१ हजार रुपयांची रोकड आणि पेनड्राइव्ह चोरुन नेला. ही चोरी तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली होती, तात्काळ शिवाजीनगर पोलिसांनी ४ जणांना अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातून अटक केली आहे. मनोज भगतसिंग पवार, संदीप संजय गौड, रतिलाल प्रेमलाल परमार, विकी साळुंखे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. हा प्रकार सिंचननगर येथील भीमथडी जत्रेत रविवारी सायंकाळी पाच वाजता घडला होता. फिर्यादी महिला यांचा भीमथडी जत्रेत महिला बचत गटाचा स्टॉल आहे. रविवारी जत्रेत मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. यावेळी त्यांनी आतल्या बाजूला ठेवलेल्या बॉक्समधून चोरट्यांनी ७१ हजार रुपयांची रोकड चोरुन नेली. ही गोष्ट त्यांच्या लगेच लक्षात आली. त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी स्टॉलवरील सीसीटीव्ही तपासले आणि तांत्रिक विश्लेषण मधून पोलिसांना या तरुणांपर्यंत पोहचता आलं आणि त्याला ताब्यात घेतलं. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला ही मूळची वाई जवळील आझर्डे गावच्या रहिवासी आहेत. सिंचननगर येथील मैदानावर भीमथडी जत्रेमध्ये तक्रारदार महिलेने विविध वस्तू विक्रीचा स्टॉल लावला होता. रविवारी स्टॉलच्या गल्ल्यातून ७१ हजार रुपयांची रोकड आरोपी पवार, गौड, परमार, साळुंखे यांनी चोरली होती. यापूर्वी कोथरुड भागातील एका महिलेच्या स्टॉलमधील ७० हजार रुपयांची रोकड चोरीला गेली होती.

### मद्यधुंद चालकाने पहिल्यांदा दुचाकीला उडवलं

#### लोकांच्या मारहाणीच्या भीतीने ट्रक गल्ली-बोळातून नेला; घरं आणि दुकानं उडवत गेला

लातूर । प्रतिनिधी

मद्यधुंद ट्रक चालकाने लातूरमध्ये अनेक वाहनं उडवल्याचा प्रकार समोर आलाय. दारु पिऊन ट्रक चालवत ड्रायव्हरने चौघांना जखमी केलंय. याशिवाय, अनेक घराचं आणि दुकानांचेही या अपघातामुळे नुकसान झाले आहेत. सुदैवाने यामध्ये अद्याप कोणतीही जीवीतहानी झालेली नाही. अधिकची माहिती अशी की, लातूर शहराजवळील लातूर-नांदेड बायपासवरील सिद्धेश्वर मंदिराजवळील एका हॉटेलजवळ ट्रकचालकाने दुचाकीला उडविले. मारहाण आणि कारवाईच्या भीतीने नशेत असलेल्या ट्रकचालकाने बायपास सोडून शहरातील गल्लीबोळात ट्रक भरधाव वेगाने नेला . समोर असणाऱ्या वाहनांची, घरांची आणि दुकानाची पर्वा न करता ट्रक हा सुसाट निघाला होता. अखेर पटेल चौकात ट्रकचा वेग मंदावताच नागरिकांनी चालकास खाली खेचले आणि चोप दिला. यामध्ये अनेक वाहनांचे आणि दुकानांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. महापूर येथील रहिवासी असलेल्या गुरुबा बाबुराव पोतवळे (रा. महाप) हा ट्रक चालक आहे. ऊस कारखान्यावर खाली करुन तो लातूर-नांदेड बायपासवरुन निघाला होता. दरम्यान, पिंटू हॉटेलजवळ त्याने दुचाकीला धडक दिली. अचानक घडलेल्या घटनेमुळे दुचाकींनी त्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. कारवाई आणि मारहाण होईल या धास्तीने नशेत असलेल्या गुरुबाने कोणताही विचार न करता ट्रक (एम.एच. २५ यु २६१२) थेट शहरातल्या गल्लीबोळात घातली. रिंगरोडवरुन सिद्धेश्वर मंदिरापासून शहरात एंन्ट्री केलेल्या या ट्रकने लाड गल्ली, सुरत शहावली दर्गा, पटेल चौक या मार्गावर उभी असलेली वाहने तर उडवलीच पण दुकानांचे शटर आणि काही पत्र्यांच्या घराचेही नुकसान केले. पटेल चौकात समोरुन कार आल्याने ट्रकचा वेग मंदावला आणि संतप्त लोकांनी त्याला ट्रक मधून बाहेर ओढत चांगलाच चोप दिला.. गांधी चौक पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# राज्यात 27-28 डिसेंबर दरम्यान गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

## खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

२७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

२७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर,



जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.

२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.

२९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

### संत जनाबाई भावसार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार: प्रकाशराव कानगावकर

बीड । प्रतिनिधी

संत जनाबाई भावसार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी केले. बीड जिल्हा भावसार समाजाच्या वतीने मंगळवार दि. २४ डिसेंबर रोजी बीड जिल्हा भावसार समाजाच्या दिनदर्शीकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रमाकांत पतंगे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, सचिव अनिल सुत्रे, कार्याध्यक्ष गोपाळ कंकाळ, कोषाध्यक्ष कल्याणराव पतंगे, परळी भावसार समाजाचे अध्यक्ष प्रभाकरराव हाजारे, माजलगावचे अध्यक्ष प्रदीपराव भावसार, बीड भावसार समाजाचे अध्यक्ष कैलास रंगदळ, वडवणी भावसार समाजाचे अध्यक्ष महेश सदरे, अंबाजोगाई शहराध्यक्ष मनीष सुत्रावे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

बीड शहरातील शनिवार पेठ भागातील भावसार समाज मंदिर येथे बीड जिल्हा भावसार समाजाच्या दिनदर्शीकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना बीड जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले की, भावसार समाजाची आर्थिक प्रगती व्हावी .

### खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची शिकवण सर्वांच्या कृतीत आली पाहिजे : डॉ हनुमंत सौदागर

केज । प्रतिनिधी

खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची शिकवण आपल्या सर्वांच्या कृतीत आले पाहिजे असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात साने गुरुजी जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्राचार्य विजय शिनगारे, प्रा डॉ नागेश कराळे, अविनाश गालफाडे ,सुजित नायकवडे, सतीश नेहरकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले शेतकरी, कष्टकरी ,वंचित उपेक्षितांसाठी आयुष्यभर लढा देणारे साने गुरुजी साहित्यातून



वास्तवदर्शी जीवन मांडत राहिले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सेवाकार्याचा वसा सांभाळावा असे मत त्यांनी व्यक्त केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथपाल संतोष कुमार साळवी यांनी केले तर आभार रमेश रितपुरे यांनी मानले.

# लेखकांची नवीन पिढी घडवताना....

बीड । प्रतिनिधी

लेखकांची नवीन पिढी घडावी म्हणून खूप कमी प्रयत्न होतात आणि त्यात लहान मुलांनी लिहिलेली पुस्तके प्रकाशित करणे हे खपाच्या भीतीमुळे प्रकाशकांच्या आवाक्याबाहेरचे असते.मात्र केवळ आर्थिक फायद्याचा विचार न करता लेखकांची नवीन पिढी घडवण्याचा स्तुत्य प्रयत्न अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे श्री.अनिल कुलकर्णी व श्री.माधव राजगुरू गेली ५० वर्षे करीत आहेत.

याचाच भाग म्हणून कथापंचक या पाच लहान




मुलींनी (रेणुका जोशी, शाल्वी कुलकर्णी,सृष्टी धनावडे,त्रिषा पाटील,चिन्मयी शेटे) लिहिलेल्या कथासंग्रहाचे प्रकाशन बाल लेखिका पलोमा माडगूळकर हिच्या शुभहस्ते अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व बालसाहित्यिक भारत सासणे सर व डॉ.वर्षा तोडमल,संपादिका व मराठी विभाग प्रमुख,गरवारे महाविद्यालय यांच्या उपस्थितीत झाले.

साहित्यविश्वात येणारी गदिमांची चौथी पिढी म्हणजे पलोमाच्या इंग्रजी काव्यसंग्रहाचे प्रकाशन जानेवारी महिन्यात होत आहे याचा खूप आनंद आहे.

### २९ डिसेंबर रोजी होतकरू व गरजू युवकांसाठी विशेष बैठकीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने गुरव समाजातील व्यवसाय करू इच्छिणार्या होतकरू व गरजू युवक-युवतींसाठी १ ते १० लाखा पर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येणार असून ज्यांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्या साठी २९ डिसेंबर रोजी बीड येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर बैठकीस अग्रणी बँकेचे व्यवस्थापक झा सर, व आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक राठोड हे या बैठकीत युवकांना मार्गदर्शन करणार आहेत.

# खालापूर तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा संपन्न

## वडगाव शाळेच्या उत्तम अयोजनामुळे स्पर्धा आनंददायी वातावरणात पडल्या पार

रायगड । प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद,अलिबाग शिक्षण विभाग (प्राथ.) तर्फे शिक्षण विभाग पंचायत समिती खालापूर च्या क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट व मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-२ रायगड जिल्हा प्रथम व मुंबई विभाग द्वितीय शाळा वडगाव च्या प्रांगणात आनंददायी व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.या स्पर्धेसाठी खालापूर,चौक व वावोशी बिटाचे प्रत्येकी १६ संघ असे एकूण ४८ संघात या स्पर्धा पार पडल्या,यावेळी बेचकी,लगोरी,माती शिल्प,दोरी उड्या, लंगडी सह सांघिक नृत्य,समुहगीत गायन,पथनाट्य या आठ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या.यातील प्रथम क्रमांक जिल्ह्याच्या स्पर्धांमध्ये खेळवला जाईल.या स्पर्धेत वडगाव शाळेने पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करत लहान गट समुहगीत तालुक्यात प्रथम,तर मोठा गट द्वितीय व माती शिल्प तृतिह क्रमांक पटकावला तसेच रसिका, धनश्री या विद्यार्थिनींनी लंगडी गटात आपला ठसा उमटवला आहे.याप्रसंगी वडगाव शाळेचे व शाळा व्यवस्थापन समितीचे विभागीय पारितोषिक मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट अयोजनाबद्दल सन्मानचिन्ह देऊन वडवळ शाळेचे सुधाकर थळे,वडगाव चे सुभाष



राठोड यांचा गौरव करणयात आला.

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव कडून सर्व विद्यार्थी शिक्षकांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती,तर ज्यूबिलियंट कडून अल्पोपहार देण्यात आला होता. खालापूर बिटातील विनोद लंके सर यांनी केली वाटप केली. सदर कार्यक्रमास परीक्षक म्हणून श्री.राऊत सर,रिलायन्स लोधिवली,अभंगे सर जनता मोहोपाडा यांनी काम पाहिले.या कार्यक्रमात स गटशिक्षणाधिकारी कैलास चोरामले, वरिष्ठ विस्तार अधिकारी वरिष्ठ शिल्पा दास, शालेय पोषण आहार अधीक्षक दिपा परब,माजी उपसरपंच ग्रुप ग्राम पंचायत वडगाव,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा करुणा ठोंबरे,उपाध्यक्षा राजश्री जांभुळकर, केंद्र प्रमुख देविदास पाडवी, किशोर परदेशी,जगतसिंग परदेशी,संतोष पाटील,जयंत पाटील,हेमंत म्हात्रे,साधन व्यक्ती नरेश पाटील,योगेंद्र म्हात्रे व कार्यालयातील संपूर्ण अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी व्यासपीठ इतर सुविधा नरेश जांभुळकर यांनी केली,तर उत्तम सूत्र संचालन चौक शाळेच्या आरती नाईक यांनी केले.पारितोषिक वितरण व आभार सुभाष राठोड यांनी पार पाडले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोहन दहिफळे, रवींद्र घोगरे,अतुल पाटील, रजनी गायकवाड, सुनीता म्हात्रे व सर्व शिक्षकांनी व वडगाव शाळेचा संपूर्ण स्टॅफने परिश्रम घेतले.

# बीड शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद मोकाट जनावरांमुळे नागरिक त्रस्त

## नगरपालिका प्रशासन दिशाभूल करत कागदोपत्री कारवाईत व्यस्त : डॉ.गणेश ढवळे





**बीड । प्रतिनिधी**

बीडकरांची रस्त्यांवरील मोकाट कुत्री आणि जनावरांच्या त्रासापासून सुटका होण्याची शक्यता नगरपरिषद प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे मावळली आहे.जनावरे रस्त्यावर मोकाट सोडण्याच्या प्रकाराने नागरीकांना रस्ते,पाणी, पथदिवे आदी नागरी समस्यांनी त्रस्त असताना मोकाट कुत्री आणि जनावरांमुळे नविन समस्येत भर पडली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदन अथवा आंदोलनानंतर नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड कागदोपत्री सर्वकाही आलबेल असल्याचे आणि दोषींवर कारवाई सुरू असल्याचे गोलगोल उत्तर देऊन जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करताना दिसत असुन कागदोपत्रीच कारवाई केल्याचे दाखवत आंदोलकांची दिशाभूल करण्यात व्यस्त असल्याचे दिसून येत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे.

रस्त्यांवरील जनावरांच्या कळपामुळे दुचाकींच्या अपघाताचे प्रकार वाढले आहेत तर चारचाकी वाहनांचेही जनावरांच्या धडकांमुळे मोठे नुकसान होत आहे. शहरातील नगररोड, बार्शी रोड, जालना रोड या प्रमुख रस्त्यांसह शहरातील प्रमुख बाजारपेठा, शहरांतर्गत सर्वच रस्त्यांवर जनावरांचे कळप दिसुन येतात.रस्त्यांवरील जनावरांच्या कळवंड तसेच अचानक जनावरं उधळण्याने अपघातांचे प्रकार वाढले आहेत. याबाबत नगरपालिका प्रशासनाला तक्रार केल्यानंतर जुजबी कारवाई करण्यात येते. मध्यंतरी नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांनी नगरपालिकेकडुन कोंडवाडा कार्यान्वित केला असुन प्रथम ५०० रुपये दंड भरून घेताना हमीपत्र लिहून घेणार आणि पुन्हा असा प्रकार घडला तर जनावरांच्या मालकांवर थेट गुन्हे दाखल करून जनावरेच जप्त करणार असे आश्वासन दिले होते.मात्र मुख्याधिकारी यांच्या कारवाईच्या आश्वासनांचे काय झालं असा सवाल करत ते आश्वासन कागदोपत्रीच राहिल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

बीड जिल्हात जानेवारी २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या १४ महिन्यांच्या कालावधीत १४ हजार २२१ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे.बीड शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद सुरूच असुन मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरीकांना रस्त्यावर चालणे अवघड झाले आहे.म ोकाट कुत्र्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडल्या असुन यामुळे लहान मुले, महिला, वृद्धांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. बीड शहरातील गांधीनगर परीसरातील एकाच दिवशी ३० शाळकरी मुलांना कुत्र्यांनी चावा घेतला होता. शाळकरी मुलांचे लचके तोडल्याची घटना अंगावर शहारे आणणारी होती. तर बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे यांच्यासह मंत्र्यांच्या उत्तरदायित्व सभेसाठी बीडमध्ये आलेल्या ६० नागरीकांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला होता.

## आळंदी येथील अखिल भारतीय मराठा महासंघाच्या कार्यक्रमाला उपस्थित रहा: मराठा सेवक संतोष डावकर

**वडवणी । प्रतिनिधी**



पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे आज दि. २६ डिसेंबर २०२४ वार- गुरुवार रोजी दुपारी २ ते सांय. ६ पर्यत वारकरी संप्रद्यायाचे विविध कार्यक्रम तसेच गौरव सोहळा कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला वडवणी तालुक्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे असे आव्हान वडवणी तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा सेवक संतोष डावकर यांनी केले आहे.

श्री.क्षेत्र आळंदी येथे अखिल भारतीय मराठा महासंघ व जगद्गुरु तुकाराम महाराज सामाजिक अध्यात्मिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६/१२/२०२४ रोजी दुपारी २-६ वै. गोविंद महाराज केंद्रे सांस्थापित श्री. ज्ञानेश्वरी मंदिर गोपाळपूरा आळंदी येथे वारकरी संप्रदायातील संत महंत ज्येष्ठ कीर्तनकार, संत साहित्याचे अभ्यासक, वारकरी शिक्षण संस्था द्वारा ज्ञानदान करणाऱ्या गुरुजनांचे गौरव व संत पूजन केंद्रीय राज्यमंत्री मा. ना. श्री. मुरलीधर मोहोळ साहेब यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. या मंगलमय धार्मिक सांस्कृतिक सोहळ्याचे उद्घाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री जयसिंगराव गायकवाड पाटील हे करणार असून या आयोजित कार्यक्रमामुळे बहुजन समाज आणि मराठा समाज यांच्यात वाढत असलेली वैचारिक मतभेदाची दरी दूर करून 'आम्ही सारे पांडुरंगाचे वारकरी' माऊलीच्या पालखीचे भोई हा विश्वास समाजात निरंतर वाढेल, हे या कार्यक्रमाचे प्रयोजन असून श्री क्षेत्र देवाची आळंदी येथे हा सोहळा संपन्न होत आहे. संत महंत यांच्या आशीर्वादामुळे समाज सेवेची समई सतत तेवत राहावी या साठी या मंगल मय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमात राज्यतील निस्वार्थी समाजसेवा करणाय़्रा मान्यवरांचा देखील गौरव करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमाला समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येनी उपस्थित रहावे असे आव्हाहन वडवणी तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा सेवक संतोष डावकर यांनी केले आहे.

## लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडील ऊस बिलाचे पहिल्या हप्त्याची रक्कम बँकेत वर्ग: चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**



लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून सन. २०२४-२५ या चालु ऊस गळीत हंगामातील गाळपास आलेल्या ऊस बिलाचा पहिला ॲडव्हान्स हप्ता प्रतिटन रुपये २७००/- प्रमाणे ऊस उत्पादकांचे बँक खाती दि. २४/१२/२०२४ रोजी वर्ग केला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी दिली. या संदर्भात अधिक माहिती देताना ते म्हणाले की, कारखान्याचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब व सर्व मा. संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सन. २०२४-२५ चा ऊस गळीत हंगाम सुरु झालेला असुन दिनांक २४/१२/२०२४ अखेर एकुण ३१ गाळप दिवसामध्ये १३९६०० मे. टन ऊसाचे गाळप करुन सरासरी ९.३५% साखर उतायाने ५९१०० क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. याबरोबरच २५०२६६८ लिटर इथेनॉलचे उत्पादन घेवुन ६१५८४०० युनीट विजेची निर्यात केलेली आहे.

कारखान्याने मागील वेळोवेळीचे गळीत हंगामामध्ये गाळपास आलेल्या ऊसाकरीता जास्तीत जास्त ऊस दर देणेचा सातत्याने प्रयत्न केलेला असुन चालु गळीत हंगामा साठीही उच्चांकि असा ऊस दर देणेसंबंधी कारखाना व्यवस्थापनाचा मानस आहे. ऊस उत्पादकांनी आपले नजीकचे बँक शाखेतुन संपर्क साधुन ऊस बिलाची रक्कम घेवुन जावी.

## कंकालेश्वर मंदिरात श्री संत काशीबा महाराजांची पुण्यतिथी साजरी

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्री कंकालेश्वर मंदिर येथे गुरव समाजाचे संतशिरोमणी काशीबा महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

अखंड गुरव समाजाचे आराध्य दैवत संतशिरोमणी काशीबा महाराजांची बुधवार दि.२५ रोजी पुण्यतिथी निमित्त शहरातील कंकालेश्वर मंदिरात भजनाचा कार्यक्रमा संपन्न झाला. या प्रसंगी पुण्यतिथी निमित्त भाविक-भक्तांना महाप्रसाद कंकालेश्वर मंदिराच्यावतीने करण्यात आले. यावेळी अभिवादन कार्यक्रमास प्रकाशराव कानगावकर, गुरव समाजाचाचे जिल्हाध्यक्ष संजय गुरव, डॉ.रमेश कैवाडे, अंकुश निर्मळ, बापु भालेराव, गलधर, प्रभाकर महाराज गुरव, श्रीराम महाराज गुरव, अमर गुरव, चंद्रकांत गुरव, गणेश गुरव, अजय गुरव, विजय गुरव, प्रसाद गुरव, अभिषेक गुरव, अभिजीत गुरव, ऋषिकेश गुरव, शुभम दाहीतोंडे, आकाश रायते, अभिजीत रायते, विशाल दाहीतोंडे, सुरज क्षीरसागर यांच्यासह भाविक-भक्तांची संख्येने उपस्तिथी होती.

## बीडमध्ये हातभट्टीवर धाड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था सुधारण्यासाठी पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून आज पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशावरून पो.नि. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथकाने आज पहाटे पात्रुड गल्ली भागातील गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर धाडी टाकल्या. यामध्ये रसायनासह मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. डीबी पथकातील कर्मचार्यांनी शेकडो लिटर रसायन उध्वस्त केले. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. बीड शहर ठाण्यातील



डीबी पथकातील सपोनि राठोड, सहाय्यक फौजदार सिरसाट, पोहे तांबारे, पोशि सय्यद, मनोज परजणे हे आज सकाळी अवैध धंद्यांवरील कारवाईसाठी जात असतांना पात्रुड गल्ली भागातील पत्र्याच्या शेडमध्ये हातभट्टी दारूचा अड्डा असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पोनि बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८ बाजण्याच्या सुमारास पात्रुड गल्ली भागात दोन ठिकाणी छापे टाकून सहा निळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या ड्रूम मधील शंभर लिटरचे रसायन व दोन पत्र्याच्या डब्यामधील १८ लिटरचे रसायन उध्वस्त केले तर दुसर्या कारबाईत पाच लिटरचे दोन ड्रम व इतर साहित्य उध्दवस्त करण्यात आले. या दोन्ही कारवाईत हजारो रूपयांचा मुद्देमाल जप्न करण्यात आला असुन या प्रकरणी पो.ह. आजिनाथ सानप यांच्या फिर्यादीवरून राकेश प्रभाकर उर्फ गुडबा जाधव याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

## एस.सी,एस.टी,ओ.बी.सी,व स्त्रियांना गुलाम मानणाऱ्या मनुस्मृतिग्रंथाचे दहन करून

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले : ॲड तेजस वडमारे

**बीड । प्रतिनिधी**



बलभीम नगर बुद्ध विहार समिती शिवाजीनगर बीड येथे मनुस्मृती दहन करून मुक्तीदिन साजरा, महात्मा ज्योतिबा फुले यांनी सांगितल्याप्रमाणे मनुस्मृति हा ग्रंथ विषारी आहे तो जाळून टाकला पाहिजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी हानिकारक, शोषक, मनुस्मृती नेच स्त्रिया, शुद्रातीशूद्र, यांच्यावर सर्व प्रकारची गुलामी लादलेली होती, त्यामुळेच, महिलांना व शूद्रांना समाजात दुय्यम स्थान देणारी मनुस्मृति जातीव्यवस्थेवर आधारलेला ग्रंथ असल्यामुळे या मनुस्मृतीने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारलेला असल्यामुळे महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनूस्मृती हा ग्रंथ जाळून तमाम स्त्रिया व शुद्रातीशूद्र म्हजेच आजचे एस.सी, एस.टी,ओ.बी.सी व स्त्रियांना मुक्ती मिळवून दिलेली आहे, त्यामुळे बलभीम नगर येथील सर्व महिला मंडळ यांनी मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजीनगर बीड येथे अभिवादन करून मनुस्मृतीचे दहन करत मुक्तीदिन उत्साहात साजरा करण्यात आला त्यावेळी ॲड तेजस वडमारे, सिद्धार्थ वडमारे, भैय्या खेमाडे, आर्यन साळवे,आर्यन खेमाडे, अंजली वडमारे, सरिता खेमाडे, अंकिता वडमारे, साधना खेमाडे, जयश्री गवळी आम्रपाली गवळी,रम ाबाई सोनवणे, सोनाली अंकुटे, आचल वडमारे, व परिसरातील उपासक उपासिका उपस्थित होते.

## मराठवाड्यात आहे डॉक्टरांचे बोरवाडी गाव २० पैकी १६ एमबीबीएस; यंदाही तिघांचा प्रवेश

**नांदेड । प्रतिनिधी**



जिल्ह्यापासून ३५ किमीवर डोंगरदऱ्यात वसलेल्या बोरवाडीने २० डॉक्टर आणि २० नर्स घडवीत डॉक्टरांचे गाव म्हणून नावलौकिक मिळविला आहे. गावात झेडपीच्या पाचवीपर्यंतच्या शाळेशिवाय शिक्षणाची कोणतीही व्यवस्था नसतानाही केवळ दृढ निश्चयाच्या बळावर एवढ्या मोठ्या संख्येने डॉक्टर घडवणारे बहुदा एकमेव गाव असावे.

सविस्तर वृत्त असे की, जेमतेम २०० आदिवासी कुटुंब असलेल्या बोरवाडीत सर्वच कुटुंब अल्पभूधारक असून शेतीही कोरडवाहू आहे. लगतच्या आंध्रा, तेलंगणात मजुरी करून,दरवर्षीच दुष्काळाचा सामना करीत शिक्षणाची कास धरत गावाने शैक्षणिक क्रांती केली आहे.विशेष बाब अशी की,आजही अनुसूचित जमातीतील आंध हा समाज मागासलेला असून उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या अगदी नगण्य असताना यातील बहुतांश डॉक्टर हे आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेत शिकलेले असून कोणताही खासगी क्लास अथवा मोठ्या इंग्रजी शाळेत न शिकताही गावाने २० पैकी १६ एमबीबीएस, २ बीएएमएस, १ बीएचएमएस आणि १ पशुवैद्यकीय डॉक्टर याशिवाय ३० पेक्षा जास्त नर्स घडवीत डॉक्टरांचे गाव म्हणून नावलौकिक मिळविला असल्याची माहिती भोकर तालुका आदिवासी समाजाचे समन्वयक गंगाधर वानोळे यांनी दिली.

### हे आहेत बोरवाडीतील २० डॉक्टर

**डॉ.शिवाजी खदारे, डॉ.दिगंबर बुलबुले, डॉ.रामचंद्र कोठूळे,प्रा. डॉ. रंगराव भिसे, डॉ.किशोर कोठूळे,डॉ.राजू वागतकर, डॉ. प्रकाश बुलबुले, डॉ.वर्षा भिसे यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आहे तर सुमित कोठूळे, सुजीत बुलबुले,अक्षय ढोले, रोहित कोठूळे,यादोजी भिसे,मंगेश बुलबुले, यश बुलबुले,प्राजक्ता कोठूळे,ज्ञानेश्वर भिसे हे विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत.यंदासुध्दा गोविंद कोठूळे, महेश ढोले व स्नेहा बुलबुले यांनी एमबीबीएसला प्रवेश घेतला आहे.**

## आ.सुरेश धस यांनी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी चुकीचे आरोप करू नयेत : व्यापारी अमोल डुबे

### माझ्या अपहरण प्रकरणात धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी धीर दिला; पोलोसांचेही सहकार्य लाभले - अमोल डुबे यांचा खुलासा

**परळी । प्रतिनिधी**

दि.०९ डिसेंम्बर रोजी काही गुन्हेगारांनी माझे अपहरण केले होते, त्यानंतर माझ्या कुटुंबाने संपर्क करताच ना.धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे, आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी पोलिसांना सूचना करून माझी लवकरात लवकर सुटका केली. मात्र या घटनेचा आधार घेत आ.सुरेश धस यांनी पिडीत डुबे कुटुंब त्यांना भेटायला जाणार, किती रुपयात सेंटलमेंट झाली अशी चुकीची माहिती माध्यमांना देत आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार केला असल्याचे मत परळीतील अपहरण प्रकारणातील पीडित व्यापारी अम ोल डुबे यांनी व्यक्त केला आहे.

आमचे दोन पिढ्यांपासून मुंडे कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. नेहमी एकम ेकांच्या सुख-दुःखात आम्ही सहभागी असतो. त्यामुळे आमच्या कुटुंबावर संकट येताच मुंडे कुटुंबाने आमची मदत केली.

पोलिसांनी माझी तातडीने सुटका तर केलीच शिवाय अवघ्या पाच दिवसात गुन्ह्यातील आरोपींना मुद्दे-मालासह अटक केले, याबद्दल आम्ही पोलिसांचे जाहीर आभार देखील व्यक्त केले आहेत.

मात्र या घटनेच्या आडून आ.सुरेश धस हे आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असून, त्यांनी आम्ही त्यांना भेटणार वगैरे अशा स्वरूपाची अत्यंत चुकीची व धादांत खोटी माहिती माध्यमांना दिली असून, आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी त्यांनी डुबे व मुंडे कुटुंबाच्या अनेक वर्षांच्या संबंधात वितुष्ट आणू नये, असे आवाहनही अमोल डुबे यांनी केले असून, आ.सुरेश धस यांच्या माध्यमांवरील पेरल्या जात असलेल्या विविध बतावणींच्या अनुषंगाने ही एक चपराक असल्याचे मानले जात आहे.

